# अकोला पोलीस

महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

दि. ३०/०५/२०१८

## प्रेस नोट

दिनांक ३१/०५/२०१८ रोजी जागतिक तंबाखू विरोधी दिनाच्या औचित्याने जागतिक आरोग्य संघटनेने या वर्षी जागतिक तंबाखू विरोधी दिवसासाठी तंबाखू आणि हृदयरोग ही संकल्पना दिली आहे. राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाअंतर्गत पोलीस दला तर्फे पोलीस अधिक्षक श्री. एम.राकेश कलासागर व अपर पोलीस अधीक्षक श्री.विजयकांत सागर यांचे मार्गदर्शनाखाली अकोला जिल्हयामध्ये दिनांक ३१ मे ते ६ जुन २०१८ या सप्ताहाचे कालावधीत विशेष मोहिमेचे आयोजन केले आहे. यामध्ये जिल्हा प्रशासनाचे विविध विभागांनी समन्वय ठेवून या कायदयाची अंमलबजावणी व नागरीकांमध्ये तंबाखूजन्य पदार्थाबाबत जनजागृती करणे या दोन मुद्दयांवर भर देण्यात आला आहे. विशेषत: शाळा/कॉलेज मधील विदयार्थी यांचेवर लक्ष केंद्रीत करून तरूण पिढीला सिगारेट व तंबाखूजन्य पदार्थापासून दुर ठेवून त्यांचेमध्ये जनजागृती करण्याबाबत भर देण्यात येणार आहे. तसेच या सप्ताहा मध्ये दि. ३१ मे २०१८ रोजी पोलीस ठाणेतील/शाखेतील अधिकारी/कर्मचारी यांना तंबाखूजन्य पदार्थ सेवन करण्या विरोधात शपथ देण्यात येणार आहे. तसेच दिनांक ०१ जुन रोजी पोलीस मुख्यालय, अकोला येथे पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचे मौखीक व हृदयरोग तपासणी करण्यात येणार आहे.

जिल्हा पोलीस अधिक्षक श्री. एम.राकेश कलासागर व अपर पोलीस अधीक्षक श्री. विजयकांत सागर यांचे मार्गदर्शनाखाली अकोला जिल्हयामध्ये माहे जानेवारी/२०१८ ते माहे मे/२०१८ पावेतो सिगारेट व अन्य तंबाखूजन्य उत्पादने कायदा, २००३ अंतर्गत सर्वाधीक असे एकुण ३४२ गुन्हें दाखल करण्यात आले असुन त्यामध्ये ३४२ आरोपीं विरोधात मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करून त्यापैकी सुमारे २०० गुन्हयांमध्ये दोषसिध्दी झाली असुन उर्वरित गुन्हें दोषसिध्दी करिता न्यायप्रविष्ट आहे. व रू. १,७२,६९५/-चा तंबाखुजन्य मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. तसेच जिल्हयातील ५३१ शाळा/महाविदयालय परिसर यांना भेटी देवुन ते तंबाखुमुक्त करण्यात आले आहेत.

दिनांक ३१/०५/२०१८ ते ०६/०६/२०१८ या सप्ताहात पोलीस दला तर्फे पावेतो सिगारेट व अन्य तंबाखूजन्य उत्पादने कायदा, २००३ अंतर्गत सर्वच कलमा खाली कारवाईची विशेष मोहिम राबविली जाणार असुन नागरिकांनी याबाबत पोलीस दलाला योग्य सहकार्य करावे असे आवाहन मा.जिल्हा पोलीस अधिक्षक श्री. राकेश कलासागर यांनी केले आहे.

(विलास पाटील )
पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, अकोला

प्रति,

सर्ववृत्तपत्र प्रतिनिधी.........., अकोला.